आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
६ जून २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- गतवर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ७ दशांश टक्के राहीला असल्याचा केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाचा निष्कर्ष

- प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आर्थिक सल्लागार परिषदेची बैठक संपन्न

- खाद्य तेल उत्पादकांनी ठरावीक वजनाच्याच पिशव्या विक्रीसाठी द्याव्या असे केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाचे आदेश

- विविध परीक्षांमधल्या अनियमितता प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीचं जंतरमंतरवर आंदोलन

**आणि**

- पुरुषांच्या १८ वर्षांखालच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताला अजिंक्यपद

<><><><><><>

गतवर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ७ दशांश टक्के राहीला असल्याचा निष्कर्ष केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयानं व्यक्त केला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक १ दशांश टक्के होता. गेल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत आर्थिक वृद्धीचा दर ७ पूर्णांक ८ दशांश टक्के होता.

देशात सुरू असलेल्या आर्थिक सुधारणा आणि १४० कोटी भारतीयांच्या कष्टामुळं देशाचा आर्थिक विकास दर एवढ्या मोठ्या प्रमाणात असल्याचा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं गेल्या १२ वर्षात राबवलेल्या सुधारणांमुळं भारतीय अर्थव्यवस्था अशा मजबूत स्थितीत पोहोचल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा

म्हणाले. जगातले अनेक देश आर्थिक अनिश्चिततेत असताना भारत हा जगातली सर्वाधिक वेगानं वृद्धी होणारी महत्त्वाची अर्थव्यवस्था म्हणून पुन्हा एकदा उदयाला आल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग म्हणाले.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्यांची बैठक झाली. या बैठकीत भारताचं आर्थिक परिवर्तन आणि दीर्घकालीन विकासात्मक प्राधान्यक्रम यांविषयी सविस्तर चर्चा झाली, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सध्याच्या जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारताच्या आर्थिक वृद्धीला पाठबळ देण्यासाठीच्या विविध नवकल्पना आणि उपाययोजनांवर आणि पश्चिम आशियातल्या संघर्षाविषयी सर्व सदस्यांनी यावेळी आपलं मत व्यक्त केलं.

<><><><><><>

ग्राहकांच्या सोयीसाठी खाद्य तेल उत्पादकांनी एक समान वजनाच्या पिशव्या उपलब्ध कराव्या असे आदेश केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयानं दिले आहेत. त्यानुसार २०० मिली किंवा ग्रॅम, ५०० मिली किंवा ग्रॅम, १ लिटर किंवा १ किलो, २ लिटर किंवा २ किलो, ३ लिटर किंवा ३ किलो, ४ लिटर किंवा ४ किलो, ५ लिटर किंवा ५ किलो, १५ लिटर किंवा १५ किलो आणि २० लिटर किंवा २० किलो वजनातच खाद्य तेल ग्राहकांना उपलब्ध करुन द्यावं, असं मंत्रालयानं म्हटलं आहे. शेंगदाणा, सूर्यफूल, सोयाबीन यासह सर्व प्रकारच्या खाद्यतेलासाठी हे निर्देश लागू राहतील. विविध कंपन्यांचं खाद्यतेल एकसमान पॅकिंगमध्ये उपलब्ध असेल तर ग्राहकांना किंमतीची तुलना करणं सोपं व्हावं यासाठी हा आदेश देण्यात आला आहे. नवीन निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी कंपन्यांना कमाल ३ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

खाद्यतेल उत्पादकांनी या नियमांचं स्वागत केलं आहे. ३ वर्षांपूर्वी अशाप्रकारच्या एकसमान वजनाचं बंधन सरकारनं हटवलं होतं. त्यामुळं बाजारात मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण झाला होता असं भारतीय खाद्यतेल उत्पादन संघटनेचे अध्यक्ष सुधाकर देसाई म्हणाले.

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा वर्धापन दिन ३५३ वा शिवराज्याभिषेकदिन सोहळा आज सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. किल्ले रायगड इथं दरवर्षीप्रमाणेच राज्यभरातून आलेल्या शिवप्रेमींनी महाराजांना अभिवादन केलं. महाराष्ट्रात अनेक गड किल्ल्यांवर आणि अन्य ठिकाणी यानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

इस्त्राइल सरकार छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा इस्त्राइलमध्ये उभारणार आहे, अशी माहिती इस्त्राइलच्या मुंबईतल्या दूतावासाचे प्रमुख यानिव रेवाच यांनी दिली आहे. या पुतळ्यासाठी राज्य सरकारनं मदत करावी यासाठी त्यांनी मुख्यमंत्री दे◌ेवेंद्र फडणवीस यांची काल भेट घेतली होती. या पुतळ्यासाठी आवश्यक ती सर्व मदत देऊ असं फडणवीस म्हणाले.

<><><><><>

व्हेनेझुएलाच्या बोलिव्हियन प्रजासत्ताकाच्या प्रभारी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांनी आज मुंबईत बॉम्बे हाऊस इथं टाटा समूहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेत टाटा मोटर्सच्या नवीन ईलेक्ट्रिक वाहनांची पाहणी केली. रॉड्रिग्ज यांनी यावेळी इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रातील आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानाबाबत तसंच या क्षेत्रातील नवीन संधींबाबत सविस्तर चर्चा केली.

<><><><><>

विविध परीक्षा आणि भरती प्रक्रियांमधल्या अनियमितता आणि गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली आज दिल्लीत जंतरमंतर इथं आंदोलन झालं. या आंदोलनात हजारोंच्या संख्येने आंदोलक जमले होते. पेपरफुटी आणि इतर अनियमिततेप्रकरणी मंत्र्यांची जबाबदारी निश्चित करावी, तसंच शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केली. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक, भाकप नेत्या ॲनी राजा, भाकप माले चे महासचिव दीपांकर भट्टाचार्य सहभागी झाले.

<><><><><>

नैऋत्य मान्सूनचं आज राज्यात आगमन झालं. तळकोकणात आज  मान्सून दाखल झाला. दक्षिणेत संपूर्ण केरळ आणि तमिळनाडू, कर्नाटकचा अर्ध्यापेक्षा जास्त आणि आंध्र प्रदेशचा दक्षिणेकडचा काही भाग, तर ईशान्येला मिझोरामचा बहुतांश भाग आणि मणिपूरचा दक्षिणेकडचा प्रदेश व्यापून नैऋत्य मान्सून वेगाने पुढे सरकत आहे. याआधी, १० जूनपर्यंत तो राज्यात येईल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता, पण ४ दिवस आधीच तो दाखल झाला आहे.

<><><><><>

इस्रायलनं दक्षिण लेबनॉनमध्ये आज केलेल्या हवाईहल्ल्यात नऊ जणांचा मृत्यू झाला असून त्यात एक ब्रिगेडिअर जनरल, एक कॅप्टन आणि एक जवान अशा तीन लष्करी अधिकाऱ्यांचा समावेश असल्याची माहिती लेबनॉनच्या सैन्यानं दिली आहे.  इस्रायल आणि  लेबनॉन यांच्यात नव्यानं युद्धबंदी कराराबाबत सहमती झाल्यानंतर अवघ्या काही दिवसातच हा हल्ला झाला आहे.

<><><><><>

युक्रेनने रशियातल्या सेंट पीटर्सबर्ग शहरावर ड्रोन हल्ला केल्याचं  रशियाने म्हटलं आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिममीर

झेलेन्स्की यांना भेट नाकारल्यानंतर हा हल्ला झाला आहे. युक्रेनने १४१ ड्रोन डागल्याचं रशियातल्या अधिकृत सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><><>**

पुरुषांच्या १८ वर्षांखालच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतानं जपानला ४-१नं हरवत अजिंक्यपदावर नाव कोरलं. आज जपानच्या काकामिगाहारा इथं झालेल्या अंतिम सामन्यात भारताच्या वतीनं आशीष पुरती यानं तीन आणि केतन कुशवाहा यानं एक गोल केला. जपानचा एकमेव गोल गाकू नुमाडा यानं नोंदवला.

त्याआधी, महिलांच्या १८ वर्षांखालच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताच्या संघानं कांस्यपदकाची कमाई केली. या सामन्यात त्यांनी कोरियाच्या संघावर ३-० असा विजय मिळवला.

**<><><><><><>**

भारत आणि अफगाणिस्तान मध्ये चंदीगड इथं सुरु असलेल्या एकमेव चाचणी कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं आज पहिल्या दिवसअखेर ३ बाद ३६८ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिल आणि सलामीवीर के एल राहुल यांनी आज आपली वैयक्तिक शतकं झळकावली. आजचा खेळ थांबला तेव्हा गिल १०३ तर पंत ५० धावांवर खेळत होते.

**<><><><><><>**

जपान इथं होणाऱ्या आशियाई स्पर्धेसाठी भारताच्या टी ट्वेंटी क्रिकेट संघाचं कर्णधारपद बीसीसीआयनं श्रेयस अय्यरकडे सोपवलं आहे. १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीला या संघात स्थान मिळालं आहे. भारतीय क्रिकेट संघातला सर्वात कमी वयाच्या खेळाडूचा सचिन तेंडुलकरचा विक्रम त्यांनं मोडला आहे.

उप कर्णधार तिलक वर्मा यांच्यासह रवी बिष्णोई, अभिषेक शर्मा, नितीश कुमार रेड्डी, जसप्रीत बुमराह, संजु सॅमसन, अक्षर पटेल, हर्षित राणा, इशान

किशन, वॉशिंग्टन सुंदर, अर्शदीप सिंग, शिवम दुबे आणि वरूण चक्रवर्ती यांचा या संघात समावेश झाला आहे.

इंग्लंड आणि आयर्लंड दौऱ्यासाठी मोहम्मद सिराज आणि प्रिन्स यादव यांचा संघात समावेश आहे.

**<><><><><><>**

पंजाब मध्ये फिरोझपूर - फाजिका इथं आज एक खाजगी वाहन आणि ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला तर २२ जण जखमी झाले. जखमींपैकी अनेकजणांची प्रकृती गंभीर असून त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून जखमींना लौकर बरं वाटावं अशी कामना केली आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांचं अर्थसहाय्य त्यांनी जाहीर केलं आहे.

**<><><><><><>**

पत्रकारांवर हल्ले, आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध तसंच आर्थिक दबाव वाढत असलंयाचा दावा ऑल इंडिया न्यूजपेपर्स एडीटर्स कॉन्फरन्स या संघटनेनं केला आहे. सरकारची जाहरात विषयक धोरणं केवळ मोठ्या प्रसाशन गृहांना फायद्याची ठरतील अशीच आखली जातात असं संघटनेनं प्रसिदध् केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. संघटनेची वार्षिक ससर्वसाधारण सभा आज नवी दिल्ली इथं झाली. त्यात सरकारी जाहीराती सर्व प्रकाशनांना मिळाव्या अशा रीतीने धोरणं आखावी अशी मागणी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडे करण्यात आली.

**//<><><><><><>//**